# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com


===========================================================

जावक क्रमांक – ८१७/९३ दिनांक :- १४ जुलै, २०२५

**प्रसिद्धिपत्रक**

म्हाडा कोकण मंडळ सोडत - २०२५

## ५,२८५ सदनिका आणि ७७ भूखंडांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रियेचा 'म्हाडा'चे उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते शुभारंभ

**अर्ज करण्याची अंतिम तारीख १३ ऑगस्ट २०२५, रात्री ११:५९ वाजेपर्यंत**

मुंबई, दि. १४ जुलै, २०२५ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, वसई (जि. पालघर) येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत ५ हजार २८५ सदनिका व ओरोस (जि. सिंधुदुर्ग), कुळगाव-बदलापूर येथील ७७ भूखंड विक्रीकरिता आयोजित सोडतीसाठी अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते आज करण्यात आला.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला मुंबई इमारत दुरूस्ती मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, मुख्य अभियंता श्री. सुनील नन्नावरे, कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर तसेच इतर विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

याप्रसंगी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी सांगितले की, कोकण मंडळातर्फे मोठ्या संख्येने सदनिका आणि भूखंड उपलब्ध करवून देण्यात आले आहेत. मुंबईच्या जवळच घरे असल्याने अधिकाधिक नागरिकांनी या सोडत प्रणालीमध्ये सहभाग घ्यावा. तसेच ते पुढे म्हणाले की 'म्हाडा'च्या संगणकीय सोडतीकरिता वापरण्यात येणारी IHLMS 2.0 ही संगणकीय सोडत प्रणाली अत्यंत सोपी, सुलभ, सुरक्षित आणि महत्वाचे म्हणजे पूर्णतः ऑनलाइन असल्याने मानवी हस्तक्षेपास यामध्ये वाव नाही. सोडत प्रक्रियेतील नोंदणी ते सदनिकेचा ताबा या सर्व प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच केल्या जातात. तसेच राज्यातील इच्छुक अर्जदारांना सावधानतेचा इशारा देत श्री. जयस्वाल यांनी आवाहन केले की, सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्याकरिता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरूनच सोडतीसाठी अर्ज नोंदणी करून सोडत प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे. सोडत प्रणालीमध्ये पात्र ठरलेले अर्जदारच संगणकीय सोडतीत सहभाग घेऊ शकतील. म्हाडाच्या सदनिकांचे वितरण हे केवळ संगणकीय सोडतीच्या माध्यमातूनच केले जाते. याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारे म्हाडाच्या सदनिकांचे वितरण केले जाऊ शकत नाही याबाबत नागरिकांनी दक्षता घ्यावी असेही श्री. जयस्वाल यांनी स्पष्ट केले. म्हाडा सोडतीसाठी अर्ज करण्याकरिता https://housing.mhada.gov.in हे अधिकृत संकेतस्थळ असून या व्यतिरिक्त कुठल्याही अनधिकृत संकेतस्थळावर अर्जदारांनी सोडतीत सहभाग घेऊ नये, कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नये तसेच कोणतेही आर्थिक व्यवहार करू नये, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले

तसेच या प्रसंगी मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती गायकर यांनी म्हणाल्या की, सोडत प्रक्रियेत अर्ज सादर करतेवेळी सोडत प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे नीट अवलोकन करून माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या रकमेइतकेच अनामत रकम उत्पन्न गटनिहाय ऑनलाइनच अदा करावे. तसेच ही प्रक्रिया मानवी हस्तक्षेपाशिवाय कार्यरत असल्याने म्हाडा अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे रोख रकमेची मागणी केली जात नाही, याची इच्छुक अर्जदारांनी नोंद घ्यावी. सदनिकांच्या विक्रीकरिता मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ /दलाल/ मध्यस्थ

व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस कोकण मंडळ अथवा म्हाडा अथवा मंडळाचे प्रशासन जबाबदार राहणार नाही.

श्रीमती गायकर यांनी माहिती दिली की, सोडतीसंदर्भात अर्ज भरतांना अर्जदारांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी मंडळातर्फे ०२२ - ६९४६८१०० हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

कोकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली ही सोडत पाच घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ५६५ सदनिका, १५ टक्के एकात्मिक शहर गृहनिर्माण योजनेअंतर्गत ३००२ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजना व विखुरलेल्या सदनिका आहे त्या स्थितीमध्ये या योजनेअंतर्गत १६७७ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत (५० टक्के परवडणार्या सदनिका) ४१ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत ७७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

सदर सोडतीसाठी दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील. सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची प्रारूप यादी २१ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ०६ .०० वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादीवर आपल्या दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता 'म्हाडा'च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता पात्र अर्जाची संगणकीय सोडत ठाणे येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे जाहीर केली जाणार आहे. अर्जदारांना सोडतीचा निकाल तात्काळ मोबाईलवर एसएमएस द्वारे , ई-मेल द्वारे तसेच ऍपवर देखील प्राप्त होणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\93-2025 KB lottery go live programme 1.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. ☎ 022-55405066/77. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 817/93 Dt. 14th July 2025

**Press Release**

# Online application process for MHADA Konkan Board Lottery 2025 inaugurated by VP & CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS

**Last date to apply is August 13, 2025, by 11:59 PM; 5,285 flats and 77 plots across Thane, Palghar, Badlapur, and Sindhudurg**

Mumbai, July 14, 2025: The Konkan Housing and Area Development Board, a regional unit of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), has begun the online registration and application process for its 2025 housing lottery. The lottery includes 5,285 flats and 77 plots under various housing schemes in Thane city and district, Vasai in Palghar district, Kulgaon–Badlapur, and Oros in Sindhudurg district.

The application process was formally inaugurated today by MHADA Vice President and Chief Executive Officer Mr. Sanjeev Jaiswal, IAS, during a Go Live programme held at MHADA Headquarters, Bandra (East), Mumbai. The event was attended by Mr. Milind Shambharkar, Chief Officer of the Mumbai Repairs and Reconstruction Board; Mr. Milind Borikar, Chief Officer of the Mumbai Board; Chief Engineer Mr. Sunil Nannavare; Mrs. Revati Gaikar, Chief Officer of the Konkan Board; and other departmental officers.

Speaking on the occasion Mr. Jaiswal noted that the Konkan Board has made available a significant number of housing units and plots. He encouraged citizens, particularly those seeking housing near Mumbai, to participate in the process. He stated that the IHLMS 2.0 software used for this lottery is simple, accessible, secure, and entirely online, with no scope for manual intervention. The complete process, from registration, application to possession of the flat, is digital.

He further advised all aspiring applicants to participate in the lottery process only through MHADA's official website, https://housing.mhada.gov.in. Only applicants who meet the eligibility criteria and complete documentation through the system will be included in the lottery. Mr. Jaiswal made it clear that allotment of MHADA flats takes place solely through this computerised lottery process, and there is no alternative mechanism for distribution.

Citizens are urged to exercise caution and not to share personal details or engage in financial transactions on unauthorised websites.

Meanwhile, Mrs. Revati Gaikar informed that applicants must read the information booklet provided in the system before submission and pay the exact EMD - earnest money deposit online as per the respective income category. She emphasised that no MHADA staff demands or accept any cash payments, and no representatives, advisors, or agents have been appointed by the Board for the sale of the flats in the lottery. Applicants are warned not to engage with any third-party intermediaries. MHADA and the Konkan Board will not be held responsible for any fraudulent or unauthorised dealings.

A helpline has been set up to support applicants during the process. The helpline number is 022-69468100.

This lottery has been structured into five components: 565 flats under the 20% Inclusive Housing Scheme, 3,002 flats under the 15% Integrated Urban Housing Scheme, 1,677 flats under the Konkan Board Housing Scheme (including scattered units), 41 flats under the 50% Affordable Housing category, and 77 plots under the same board scheme.

Online applications must be submitted by 11:59 PM on August 13, 2025. Earnest money can be paid online until 11:59 PM on August 14, 2025. Applications with complete documentation will be processed through the digital system. A provisional list of eligible applications will be published on August 21, 2025, at 6:00 PM on MHADA's official website. Applicants may raise claims or objections until 6:00 PM on August 25, 2025. The final list of eligible applicants will be released on September 1, 2025, at 6:00 PM.

The computerised lottery draw will be held at 10:00 AM on September 3, 2025, at Dr. Kashinath Ghanekar Auditorium, Thane. Results will be shared immediately with applicants via SMS, email, and through the MHADA mobile application.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA




म्हाडा
MHADA
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई
५३६२ निवासी सदनिका
व भूखंडाचा ऑनलाईन
अर्ज नोंदणीचा शुभारंभ
GO LIVE
१४ जुलै २०२५.
वेळ दुपारी १:०० वाजता
विनीत